परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.
वैद्यकीय विभाग (धन्वंतरी कक्ष)
क्रमांक-वैद्य/१४अ/कावि/५१९/२०२०
दिनांक -०८/०९/२०२०

**विषय : मनपा कर्मचा-यांना देणेत येणा-या प्रतिपुर्ती व अग्रीम रकमेबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व दवाखाना/रुग्णालयामधून मनपा कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणारे नातेवाईक यांचेवर मोफत उपचार केले जातात यासाठी वैद्यकीय विभागातून वैद्यकीय उपचार कार्ड देणेत आलेले आहे. ज्यामध्ये कर्मचा-यावर अवलंबून असणारे नातेवाईकांचे नाव त्यांचे वय, कर्मचा-याशी नाते व इतर माहिती दिलेली असते. मनपा रुग्णालयामधून कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणारे नातेवाईक यांचेवर उपचारादरम्यान आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याचबरोबर एक्सरे, प्रयोगशाळा तपासण्या, सोनोग्राफी व इतर तपासण्याही केल्या जातात.

मनपाचे रुग्णालयामधून जे उपचार व चाचण्या उपलब्ध नाहीत, अशा उपचाराकरिता मनपाने निश्चित केलेल्या रुग्णालयांमधून उपचार घेणेकरीता व चाचण्यांकरिता रुग्णास पाठविले जाते. त्यासाठी आवश्यकता असलेस आगाऊ रक्कम दिली जाते अथवा कर्मचा-यानी स्वत: केलेल्या खर्चाच्या रक्कमेची प्रतिपुर्ती केली जाते. अपघात किंवा काही तातडीक स्वरुपाच्या आजारांमध्ये मनपाने निश्चित केलेल्या रुग्णालयांशिवाय इतर खाजगी रुग्णालयांमधून उपचार घेतले असलेस उपचाराचे तातडीकतेचे स्वरुप पाहून देयकांची अदायगी करणेत येते. सदर वैद्यकीय प्रतिपुर्तीचे कामकाज हे वैद्यकीय विभागातुन करणेत येते. मनपाचे रुग्णालयांमधून बाहेरील खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेल्या उपचारांचे देयकांची तपासणी व उपचार मनपा रुग्णालयात होतात किंवा नाही? याची खात्री करणेत येते. सदरचे कामकाजात सुसुत्रता येणेकामी सर्व विभागप्रमुखांना कळविणेत येते की, वैद्यकीय उपचाराकरीता आगाऊ रक्कम घेतेवेळी किंवा प्रतिपुर्तीकामी प्रकरण सादर करतेवेळी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१) सोबत वैद्यकीय प्रतिपुर्तीची मागणी करणेकरीताचा अर्जाचा नमुना जोडला आहे. सदरचे नमुन्यामध्ये वैद्यकीय प्रतिपुर्ती अथवा अग्रिमची मागणी करणेत यावी व त्यासोबत जोडावयाची कागदपत्रे अदययावत असावीत. अन्यथा अपुर्ण असणारे अर्ज वैद्यकीय विभागात स्विकारले जाणार नाहीत व होणा-या विलंबास खातेप्रमुख यांना जबाबदार धरणेत येईल.

२) मनपाचे बरेच कर्मचारी/अधिकारी मनपाचे रुग्णालयामध्ये उपचार होत असतानाही बाहेरचे खाजगी रुग्णालयात उपचार घेतात व नंतर त्याची देयके मिळणेकामी वैद्यकीय विभागाकडे पाठवतात. बाहेरचे खाजगी रुग्णालयात उपचार घेणेची विभागप्रमुख वैद्यकीय विभाग यांचे शिफारस पत्र किंवा मनपा रुग्णालयातुन दिलेली वैद्यकीय अधिका-याची रेफरचिट (शिफारस पत्र) असणे आवश्यक आहे. अन्यथा अशा देयकांची प्रतिपुर्ती कर्मचारी/अधिकारी यांना दिली जाणार नाही.

३) मनपाचे रुग्णालयात उपचाराव तपासण्या होत नसलेस अशा रुग्णांना मनपा रुग्णालयातुन ज्या बाहेरील खाजगी रुग्णालयात उपचार घेणेकामी विभागप्रमुख वैद्यकीय विभाग शिफारस करतील त्याच रुग्णालयात उपचार घ्यावे लागतील. कर्मचारी/अधिकारी यांनी विशिष्ट रुग्णालयातच उपचार मिळणेकामी आग्रह धरु नये.

M-627

४) विना शिफारशीने बाहेरचा खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेल्या कर्मचारी/अधिकारी व त्यांचेवर अवलंबून असणारे नातेवाईक यांची उपचार देयके वैद्यकीय विभागात स्विकारली जाणार नाही. कर्मचारी/अधिकारी यांनी स्वत: किंवा नगरसेवकांच्या शिफारशीने अशी देयके मिळणेकामी आग्रह धरु नये व बाहय दबाव आणू नये.

५) मनपा कर्मचारी/अधिकारी यांनी त्यांचेकडील वैद्यकीय उपचार कार्ड अद्यावत ठेवावे. स्वत: व स्वत:वर अवलंबून असणारे नातेवाईक यांची नावे वैद्यकीय उपचार कार्डमध्ये असणे आवश्यक आहे.

६) मनपा कर्मचारी/अधिकारी व त्यांचेवर अवलंबून असणारे नातेवाईक (कुटूंब व्याख्येनुसार) यांनाच वैद्यकीय प्रतिपुर्ती देता येते. अवलंबून नसणारे नातेवाईकांची देयके प्रतिपुर्ती व अग्रीमसाठी पाठवू नये यासाठी खातेप्रमखांनी वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके पाठवितेवेळी याबाबतची खात्री करुन देयके अदायगीकामी शिफारस करावी.

७) मनपा कर्मचारी/अधिकारी यांनी उपचाराकरिता अग्रीम घेतले असलेस उपचारानंतर त्याचे समायोजन करणे गरजेचे आहे. समायोजन केलेनंतर त्याची माहिती अथवा आदेशाची प्रत वैद्यकीय विभागाकडे पाठविणेत यावी. अग्रीम रकमेचे समायोजन करून घेणेची जबाबदारी संबधित विभाग व शाखाप्रमुख यांची राहिल.

८) अग्रीम मागणी व प्रतिपुर्ती देयकांचे रक्कमेची मंजुरी हि नियमानुसार केली जाईल. विशिष्ट रकमेच्या मंजुरीसाठी कर्मचारी/अधिकारी यांनी आग्रह धरु नये अथवा लोकप्रतिनिधीकडून दबाव आणू नये. प्रतिपुर्ती देयके वैद्यकीय विभागाकडे दिल्यानंतर कर्मचा-यांनी देयके मिळणेबाबत विभागाकडील कर्मचा-याकडे स्वत: येण्याची गरज नाही. देयकासंदर्भातील माहिती टपालातून संबधित विभागास कळविली जाईल.

९) कर्मचारी/अधिकारी यांनी स्वत:साठी किंवा त्यांचे नातेवाईकांसाठी कोणत्याही विमा योजनेतून अथवा अन्य कोणत्याही वैद्यकीय प्रतिपुर्ती योजनेतून शासकीय/निमशासकीय कार्यालय किवा खाजगी संस्था अथवा कार्यालयातून वैद्यकीय प्रतिपुर्ती अथवा अग्रीम घेतलेले नाही याबाबत खातेप्रमुखांनी खात्री करावी.

१०) कर्मचारी/अधिका-यांवर अवलंबून असणारे नातेवाईक निवृत्ती वेतन मिळणेस पात्र असतील किंवा घेत असतील तर त्यांचेसाठी वैद्यकीय प्रतिपुर्ती किंवा अग्रीम रक्कम मंजुर केली जाणार नाही.

वरील परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे व परिपत्रकातील सर्व बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी. खातेप्रमुखांनी वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके व वैद्यकीय अग्रीम रकमेची प्रकरणे पाठविताना सर्व योग्य त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करुनच प्रकरणे सादर करावी. कर्मचारी/अधिकारी यांनी अर्जात दिलेली माहिती बरोबर असलेबाबतची स्पष्ट शिफारस देणेत यावी. प्रतिपुर्ती व अग्रीम देणेबाबतची प्रकरणे अपुर्ण असलेस होणा-या विलंबास खातेप्रमुख यांना जबाबदार धरणेत येईल.

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८.**

प्रत : **सर्व विभाग प्रमुख,**

२/- दि.१५/०९/२०२० पासून धन्वंतरी योजना बंद करून वरील परिपत्रकाप्रमाणे प्रतिपुर्ती योजना लागू करण्यात येत असून सदर परिपत्रक आपले नियंत्रणाखालील कर्मचा-यांचे निदर्शनास आणून दयावे.

M-628

(४४६)

३

## वैद्यकीय प्रतिपुर्तीकामी मागणी करण्याकरिता करावयाचे अर्जाचा नमुना

१) कर्मचा-याचे नाव, पदनाम व संगणक क्रमांक -

२) कर्मचारी ज्या ठिकाणी काम करित आहे त्याचे विभागाचे नावासह माहिती -

३) कर्मचा-याचा मुळ पगार -

४) सेवा कालावधी -

५) रूग्णाचे नाव व कर्मचा-याशी नाते -

६) आजाराचे स्वरुप व कालावधी -

७) रूग्णाने मनपा रूग्णालयात पुर्वी याच आजारासाठी उपचार घेतले आहे किंवा नाही, घेतले असल्यास रूग्णालयाचे नाव -

८) उपचार घेतलेल्या खाजगी रूग्णालयाचे नाव अडमिट व डिसचार्ज दिलेचा दिनांक -

९) अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडली आहेत काय? -

(१) मनपा ओळखपत्राची छायांकित प्रत -

(२) वैद्यकिय उपचार कार्डची छायांकित प्रत -

(३) रूग्णाचा फोटो, रूग्णालया प्रमुखांचा शिक्का व स्वाक्षरीसह -

(४) मनपा रूग्णालयाकडील रेफरचीट -

(५) मनपा रूग्णालयात याच आजारासाठी उपचार घेत असल्यास केसपेपर, डिसचार्ज कार्ड, ए.एम.सी.कार्ड ची छायांकित प्रत -

(६) तातडीक स्वरुपात खाजगी रूग्णालयात दाखल केले असलेस मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना यासंदर्भात कळविलेबाबतची पत्राची छायांकित प्रत -

(७) अपघात होवून तातडीक स्वरुपात दाखल केले असलेस पोलीस पंचनाम्याची छायांकित प्रत किंवा एम.एल.सी. नंबर -

(८) कोणत्याही विमा योजनेतुन किंवा अन्य कोणतीही प्रतिपुर्ती योजना,शासकीय,निमशासकीय कार्यालय किंवा खाजगी कंपनीकडे प्रतिपुर्ती किंवा अग्रिम मिळणेची मागणी केली आहे काय?

(९) याच आजारासाठी आगाऊ रक्कम घेतली असलेस त्याचा मंजुरी आदेश व रक्कम

१०) वैद्यकीय खर्चाची मागणी केलेल्या रकमेचा तपशील

| अ.क्र. | बिल क्रमांक | दिनांक | रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

**(कर्मचा-याची स्वाक्षरी)**

(४४९)

5

## खातेप्रमुखांची शिफारस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८
................................ विभाग
जा.क्रं. -
दिनांक

वरीलप्रमाणे........................विभागाकडे काम करीत असलेले श्री।श्रीम................ .............................................................पदनाम.............................................यांनी त्यांचे.............................श्री।श्रीम...........................................................................यांचे उपचारासाठी वैद्यकीय प्रतिपुर्ती। अग्रिम र.रु...............................(अक्षरी र.रु.........................................................) ची मागणी केली आहे. सदर कर्मचारी।अधिका-याने अर्जामध्ये दिलेली माहिती बरोबर असुन त्यांना आगावु रक्कम।वैद्यकीय प्रतिपुर्ती र.रु............................... (अक्षरी र.रु.................................. ........................................................) मंजुर करणेस स्पष्ट शिफारस करणेत येत आहे.

खातेप्रमुखाची स्वाक्षरी